अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

ऑडीओलॉजीस्ट व स्पीच लँग्वेज थेरपीस्ट डॉ. रविशंकर रा. नवले M.ASLP (मुंबई)
जागतिक श्रवण दिना (३ मार्च) निमित्त ... बहिरेपणावर निदान व उपचाराचे शिबीर
२ ते ४ मार्च २०२६ | स. १० ते रा. ७ | नोंदणी फि : रु. ३००
पावरफुल | अदृश्य | रिचार्जेबल
वॉटर रेझीस्टन्स | मोबाईलद्वारे नियंत्रित
स्मार्ट फोन व टी.व्ही. कनेक्टीव्हिटी




एक्स्चेंज ऑफर. | डिजिटल पेमेंटची. | EMI द्वारे श्रवण यंत्र उपलब्ध.

सर्व प्रकारच्या श्रवण व वाचा दोषांवर निदान व उपचारासाठी
सोलापूर व आसपासच्या जिल्ह्यातील पहिले व एकमेव अधिकृत विश्वसनीय क्लिनिक.
2008 पासूनचे | ISO 9001 : 2015 प्रमाणित
नवले स्पीच व हिअरिंग क्लिनिक®
वेलनेस झोन, अश्विनी हॉस्पिटल रोड, नाना नानी पार्क समोर, सात रस्ता, सोलापूर. 09960888595
नोंदणीसाठी 09372107362
शाखा: लातूर | बारामती | मिरज

www.surajyadigital.com । शनिवार, दि. २८ फेब्रुवारी २०२६ । ▸ वर्ष : २४ वे ▸ अंक : १५१ वा ▸ किंमत : ५ रुपये ▸ पाने १२

## सोलापूर हादरले

# त्रासाला कंटाळून पती-पत्नीची आत्महत्या कॅन्टीनवाल्या तरूणाच्या मुसक्या आवळल्या

- कलावती नगरातील घटनेने शहरात माजली खळबळ
- द.तालुक्यातील शिरपनहळ्ळी गावावर शोककळा

**सोलापूर/प्रतिनिधी**

सोलापूर शहरात एक धक्कादायक, गूढ आणि तितकीच हॉरर घटना समोर आली आहे. अक्कलकोट रोड एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या हद्दीत राहत्या घरात पती-पत्नीचे मृतदेह आढळून आल्यानंतर परिसरात एकच खळबळ उडाली. सोमनाथ धानोप्पा पाटील (वय ४०) आणि श्रीदेवी सोमनाथ पाटील (वय ३५, दोघेही रा. कलावती नगर, एमआयडीसी पोलीस ठाणे हद्द, सोलापूर) अशी मृतांची नावे आहेत.त्यांच्याजवळ सापडलेल्या चिठ्ठीमधून या प्रकरणाचे गूढ अखेर उलगडले.

विजयपूरमधील एका तरूणाच्या त्रासाला कंटाळून या दोघांनी विष पिऊन आत्महत्या केल्याचे प्राथमिक तपासात निष्पन्न झाले आहे. पोलिसांनी तातडीने विजयपूर गाठून अभिषेक दत्तात्रय कोरे (रा विजयपूर, कर्नाटक) यास अटक करून सोलापुरात आणले आणि त्याच्यावर गुन्हा दाखल केला. हे पती-पत्नी गुरूवारी रात्री आपल्या दोन मुलींसह जेवण करून झोपी गेले होते. शुक्रवारी (ता.२७) सकाळी दोघांच्याही तोंडातून फेस येत असल्याचे दिसून आले. शिवाय त्यांचे हात-पाय गार पडले होते. त्यांच्या शरिराच्या कोणत्याच हालचाली होत नव्हत्या. दरम्यान, आई-वडील उठत नाहीत आणि त्यांच्या तोंडाला फेस आला आहे, हे पाहून दोन्ही मुली घाबरल्या. त्यांनी तातडीने आपल्या काकांना फोन करून या घटनेची माहिती दिली. काकांनी भाऊ आणि भावजयीला तातडीने शासकिय रुग्णालयात दाखल केले, मात्र डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. पती-पत्नीने आत्महत्या का केली? याबाबत पोलिसांनी तपास सुरू केला आहे.या प्रकरणातला आरोपीच सापडल्याने अनेक कारणे बाहेर येतील.



मयत पाटील दाम्पंत्य

### कलावती नगर हादरले

ही घटना सोलापूर शहरातील कलावती नगर परिसरात घडली आहे. या घटनेनं हे नगर हादरले. हे दांम्पत्य मूळचे दक्षिण सोलापूर तालुक्यातील शिरपनहळ्ळी येथील रहिवासी असून सध्या ते सोलापूर शहरातील कलावती नगर येथे वास्तव्यास होते.

### पोरींनी सकाळी पाहिले ते भयंकरच

शुक्रवारी (ता २७) सकाळी सुमारे सहाच्या सुमारास सोमनाथ आणि श्रीदेवी पाटील हे दोघेही त्यांच्या घरात बेशुद्ध अवस्थेत आढळून आले. त्यांच्या तोंडातून फेस येत असल्याचे निदर्शनास आले. आई आणि वडिलाच्या सगळ्या हालचाली थंडावलेल्या होत्या. पोरीनी घरात हे सकाळी पाहिले ते भयंकरच.

### फोन लावताना शब्द फुटेनात, हातदेखील थरथरले

या दुर्दैवी घटनेवेळी मृत पती-पत्नींसोबत त्यांच्या दोन लहान मुली घरात उपस्थित होत्या. आई-वडील सकाळी उठत नसल्याचे लक्षात आल्यानंतर मुलींनी तत्काळ आपल्या काकांना फोन करून माहिती दिली. काकांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेत दोघांनाही रुग्णालयात नेले, मात्र तोपर्यंत उशीर झाला होता.दरम्यान आपल्या काकांना घटनेची माहिती देताना पोरींना शब्ददेखील फुटेनात, फोन करताना हातदेखील थरथरत होते, असे नातेवाईकांनी सांगितले.

### घटनेचे नेमके कारण कोणाच कळेना, पोरींसह नातेवाईक, शेजारी नि:शब्द

मृत सोमनाथ पाटील यांचा पूर्वी कुक्कुटपालन व्यवसाय होता. त्यानंतर त्यांनी घरातच किराणा दुकान सुरू केले होते. पती-पत्नी दोघे मिळून हे दुकान चालवत होते. स्थानिक नागरिकांच्या माहितीनुसार, दाम्पत्याचे जीवन सर्वसाधारण स्वरूपाचे होते. घटनेचे कारण समजेना. या दाम्पत्याच्या पोरी आणि त्यांचे नातेवाईक नि:शब्द झाले होते.

> “ मयत सोमनाथ पाटील आणि त्यांची पत्नी श्रीदेवी पाटील( दोघे रा. कलावतीनगर, सोलापूर) या दोघांनी विष पिऊन आत्महत्या केल्याचे प्राथमिक निष्पन्न झाले आहे तसेच त्यांच्याकडे आढळलेल्या चिठ्ठीमध्ये त्यांची पत्नी श्रीदेवी हिला अभिषेक दत्तात्रय कोरे (रा.विजयपूर, कर्नाटक) हा तरुण नेहमी त्रास देत होता. त्याच्या त्रासाला कंटाळून या दोघांनी आत्महत्या केल्याचे चिठ्ठीत नमूद आहे. त्याप्रमाणे एमआयडीसीच्या पोलिसांनी विजयपूर येथे जाऊन अभिषेक कोरे (वय २६) याला अटक करून त्याच्यावर गुन्हा दाखल केला. अटकेतील आरोपी याचे विजयपूर येथे चहाचे कॅन्टीन असून तो अविवाहित आहे. त्याला शनिवारी न्यायालयासमोर हजर करण्यात येणार आहे
>
> **-प्रमोद वाघमारे,** वरिष्ठ पोलीस निरीक्षक, एमआयडीसी पोलीस स्टेशन

### पोलिसांकडून कसून तपास सुरु, चौंकशीतून मृत्यूमागील रहस्य येईल समोर


एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या अधिकाऱ्यांनी घटनास्थळी पंचनामा केला असून दोघांचे मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आले आहेत.पोस्टमॉर्टेम अहवालानंतरच मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट होणार असल्याचे पोलिसांनी सांगितले आहे. या घटनेने संपूर्ण परिसरात हळहळ व्यक्त होत असून पाटील कुटुंबावर कोसळलेल्या या दु:खद प्रसंगाने नागरिकांमधून हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. पोलिस तपासानंतरच या रहस्यमय मृत्यूमागील सत्य समोर येणार आहे.

---

## दुचाकीसह तिघांच्या स्वप्नांचा चक्काचूर

## ‘सीईटी’ परीक्षेतून उज्वल भविष्य घडवण्याचं ध्येय राहिलं अधुरं

# सुळेवाडीत वाढदिवसाचा केक कापण्याऐवजी दोघा तरुणांच्या चितेला अग्नी



मयत- स्वप्नील मयत- राजवर्धन जखमी- गणेश जखमी-साईराज

## काळाच्या घाल्यातून दोघे युवक ठार, नियतीचा क्रूर खेळ

**सोलापूर :** पिलीव (ता. माळशिरस) इथं म्हसवड रोडवरील बागवान टेकाजवळ गुरुवार (ता. २६) रोजी रात्री ८:३० च्या सुमारास चारचाकी गाडीला ओव्हरटेक करण्याच्या नादात स्वप्निल सुळे आणि राजवर्धन शिरतोडे या दोघांचा दुचाकींच्या समोरासमोर झालेल्या धडकेत मृत्यू झाला आहे. मृत स्वनिल याचा शुक्रवार (ता.२७) रोजी वाढदिवस होता. या निमित्तानं, दोघा मित्रांना घेऊन तो पिलीवला कपडे खरेदी करण्यासाठी निघाला होता. याच वेळी त्याच्यावर काळानं झडप घातली. त्याच्या वाढदिवसाच्या सेलिब्रेशनचा केक कापण्याऐवजी, चितेला अग्नी देऊन अंत्यसंस्कार करण्याची दुर्दैवी वेळ कुंटुबिय, नातेवाईक आणि मित्र परिवारावर सुळेवाडीत आली. या अपघातात राजवर्धन शिरतोडे (वय १८,रा.खडकी, ताण.माण) या तरुणाचा मृत्यू झाला.

दरम्यान वाढदिवसाचे भारी कपडे अंगावर घालण्याऐवजी, अंत्यसंस्काराचं ‘कफन’ स्वनिल सुळेच्या अंगावर चढलं. या घटनंनं सगळं गाव अक्षरशं हळळलं. दु:खाचा कडेलोट झाला. अंत्यसंस्कारावेळी उपस्थितांच्या डोळ्याचा कडा पाणवल्या. म्हसवडमध्ये शिकणाऱ्या आणि बारावीच्या परीक्षा देऊन ‘सीईटी’ परीक्षेद्वारे आपलं आयुष्य ‘उज्वल’ करण्याच्या ट्रॅकवर तिघा मित्रांच्या स्वप्नांचा अपघातामधील गाडीप्रमाणे अक्षरश: चक्काचूर झाला. नियतीचा क्रुर खेळ किती विचित्र असतो, याचा पुन्हा एकदा या घटनेवरुन प्रत्यय आला.

विशेषत्व, या झालेल्या अपघातामध्ये मृत स्वनिलचे दोघे मित्रदेखील गंभीर जखमी झाले आहेत.

पिलीव येथील म्हसवड रोडवरील बागवान टेकाजवळून रात्री ८:३० च्या सुमारास राजवर्धन बापू शिरतोडे (वय १८) हा आपल्या स्प्लेंडर गाडीवरून (एमएच ११ सीई ५८२८) पिलीवहून आपल्या खडकी (ता. माण, जि. सातारा) या गावाकडे जात होता. त्याचवेळी विरुद्ध दिशेने सुळेवाडीकडून एच.एफ. डिलक्स (एमएच ४५ एजी ६७९०) या गाडीवरून स्वप्निल (समाधान) शिंगू सुळे, साईराज सत्यवान सुळे व गणेश रामचंद्र माने (तिघांचेही वय १८ वर्षे) हे येत होते. स्वप्निलचा २७ फेब्रुवारी रोजी वाढदिवस असल्याने कपडे खरेदी करण्यासाठी ते सुळेवाडीहून पिलीवला जात होते. एका चारचाकी गाडीला ओव्हरटेक करण्याच्या नादात या दोन्ही मोटारसायकलची समोरासमोर जोरदार धडक झाली.

या अपघातात राजवर्धन शिरतोडे याचे

पान ७ वर...

---

## करमाळा रस्त्यावर पोलिस अन् आरोपींचा सिनेस्टाईल थरार

# अखेर ‘करेक्ट’ कार्यक्रम, कुसळंब फायरिंगमधील तिघे संशयित जेरबंद !

- अवघ्या ५ तासांत संशयितांना जेरबंद करण्यात पोलिसांना यश
- तिघा संशयितांना २ मार्चपर्यंत पोलिस कोठडीत ठेवण्याचे आदेश



**बार्शी / सोलापूर :** बार्शी तालुका हादवणाऱ्या या तालुक्यातील कुसळंब गावात गुरुवार (ता.२६) सायंकाळी पाच वाजता घडलेल्या फायरिंग थरार घटनेमधील तिघे संशयित आणि पोलिस पथक यांच्यामध्ये करमाळा रस्त्यावर साधारण ८-१० किमी सिनेस्टाईल थरार घडला. अखेर योगेश भास्कर सावंत (वय २९ रा. कुसळंब, ता. बार्शी), राहुल दत्ता गायकवाड (वय २६, मुळ राहणार कुंभारगाव ता. करमाळा, हल्ली राहणार फ्लॅट नंबर ४०३, तेजस शिंगोटे अपार्टमेंट, मांजरी रोडलगत ता. हवेली जि. पुणे) आणि रोशन दत्तात्रय पिसाळ (वय ३२ रा.बारामतीनगर, माळवाडी, हडपसर, ता. हवेली जि.पुणे) या तिघा संशयित आरोपींना अवघ्या ५ तासांत जेरबंद करण्याचा ‘करेक्ट’ कार्यक्रम केला.

या घटनेतील तिघा संशयित आरोपींना शुक्रवार (ता.२७) रोजी बार्शी तालुका पोलिसांनी अटक केली असून त्यांना कोर्टात उभे करण्यात आले असताना २ मार्चपर्यंत पोलिस कोठडीत ठेवण्याचे आदेश न्यायालयाने दिले आहेत.

विशेषत्वे, या संशयित आरोपींकडून देशी बनावटीचे पिस्तूल, जिवंत काडतुसे, लोखंडी रॉड, लाकडी दांडे तसेच गुन्ह्यात वापरलेले वाहन जप्त करण्यात आले आहे.

पान ७ वर...

---

## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



साहेब, तुमचे सर्व पेपर सापडले !

**कल्याण**
588-12-589

**मुंबई**
223-76-448

5 7 8

---

# ऐक्याची ‘तुतारी’ निनादली, पुन्हा दिली ‘टाळी’

**सोलापूर/प्रतिनिधी**

मुंबई-केंद्रीय मंत्री तथा रिपब्लिकन पक्षाचे ज्येष्ठ नेते रामदास आठवले यांना परत एकदा रिपब्लिन ऐक्याची आठवण झाली आहे. विविध गटांमध्ये विखुरलेल्या या पक्षाचे पुन्हा ऐक्य व्हावे म्हणून त्यांनी वंचित बहुजन आघाडीचे संस्थापक तसेच यापूर्वीच्या रिपाई ऐक्याचे साक्षीदार ॲड.प्रकार आंबेडकर यांना साद घातली आहे.त्यामुळे महाराष्ट्राच्या राजकिय क्षेत्रात पुन्हा ऐक्याचे नगारे वाजायला लागतील. आठवलेंकडून या अगोदरही सातत्याने प्रकाश आंबेडकरांना एकिसाठी हात मागितला पण आंबेडकरांनी त्याला दाद दिली नाही.त्यामुळे येत्या काळत ऐक्याची बांधणी होईल का हा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

### आठवलेंची ऑफर

दरम्यान, रामदास आठवलेंनी अशा प्रकारे रिपब्लिकन ऐक्यासाठी घातलेली साद ही पहिलीच नाही तर अलिकडच्या काळात अनेकदा त्यांनी प्रकाश आंबेडकरांना यासाठी पुढाकार घेण्याची विनंती केली आहे. जर अशा प्रकारे ऐक्य झाले तर जो पक्ष निर्माण होईल त्याचे प्रमुखपदेही आपणंच भूषवावे अशी ऑफरही त्याांनी आंबेडकर यांना दिली आहे. आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली आम्ही सर्वजण काम करण्यासाठी तयार आहोत असंही आठवलेंनी यापूर्वी म्हटलं आहे. पण काही व्यक्तीगत दुराव्यामुळं प्रकाश आंबेडकरांकडून याकडं दुर्लक्ष केलं जात असल्याचं चित्र आहे.

यापूर्वी अनेकदा रिपब्लिकन नेत्यांच्या एकीकरणाचे प्रयत्न झाले पण ते अयशस्वी ठरले. आता पुन्हा एकदा यासाठी आठवले यांनी सातत्याने वंचित बहुजन आघाडीचे नेते प्रकाश आंबेडकर यांना ऐक्याची साद घातली.

घटनाकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या हयातीतच रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया या नव्या पक्षाची घोषणा केली होती. पण त्यांच्या म हापरिनिर्वाणानंतर त्यांच्या प्रेरणेतून नागपूर येथे ३ ऑक्टोबर १९५७ रोजी रिपाइंची स्थापना झाली. एन. शिवराज हे या पक्षाचे पहिले अध्यक्ष होते. पण त्यानंतर रिपाइंनं अनेक नेते मंडळी घडवली पण नंतर या सर्वच नेत्यांनी आपापले वेगळे सुभे निर्माण केले. त्यामुळं रिपाइंची अनेक शकले झाली.

महाराष्ट्रातील दलित राजकारणाला म्हणा किंवा बाबासाहेबांच्या विचारांच्या राजकिय स्वप्नांना दलित नेत्याांनीच तिलांजली दिली असल्याची स्थिती अनेक वर्षांपासून बनली आहे. यापाश्र्वभूमीवर यापूर्वी अनेकदा रिपब्लिकन नेत्याांच्या एकीकरणाचे प्रयत्न झाले पण ते अयशस्वी ठरले. आता पुन्हा एकदा यासाठी रिपाइंचे नेते आणि आठवले हे सातत्याने आंबेडकर यांना साद घालत आहेत.

पान ७ वर...

